कोर्ट विद्यमान श्री.संतोष खांडरे, तहसिलदार यांचे कार्यालय, हिंगणा

रा.मा.कं. 2 /एन.ए.पी.–३४/२०२०–२१
मौजा– नागलवाडी, पहन. ६

विषय :– महाराष्ट्र शासन महसूल संहिता १९६६ चे कलम ४२ ब अन्वये निवासी अकृषक सारा स्वीकारण्याबाबत व अकृषक वापर परवानगी देणेबाबत.

संदर्भ :– १) अर्जदार शिवाजी गृप तर्फे प्रविन विनायक राउत, राह. नागपूर, तह.जि.नागपूर याचा अर्ज दिनांक ५/८/२०२०

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दिनांक ५ जानेवारी २०१७

३) सह.संचालक नगर रचना नागपूर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचे पत्र नं.र/ (नामप्रविप्रा./१२२३६, दिनांक ११/७/२०१९

४) तलाठी, सा.कं. ०६ याचा अहवाल, दिनांक ०६/०८/२०२०

आदेश

(पारित दिनांक 6 / ८ /२०२०)

अर्जदार शिवाजी गृप तर्फे प्रविन विनायक राउत, राह.नागपूर, तह.जि.नागपूर यांनी संदर्भिय पत्र कं. १ अन्वये मौजा–नागलवाडी, तहसिल हिंगणा, जि.नागपूर, पहन. ६ येथील शेतजमीन त्यांच्या भोगवटातील स.नं. ८०/२ आराजी ०.८५ हे.आर (८५०० चौ.मि.) च्या अकृषक जमिनीच्या निवासी प्रजोनार्थ अकृषक सारा शासन खजिन्यात जमा करण्याकरीता व अंतिम विकास आराखडयाप्रमाणे अकृषक वापर परवानगी करीता या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

संदर्भिय पत्र कं. २ अन्वये महाराष्ट्र महसूल संहिता १९६६ चे कलम ४२ व ४२ अ मध्ये सुधारणा करून शासनाने ५ जानेवारी २०१७ अधिसूचना द्वारे कलम ४२ ब व ४२ क अंतभूत करून अंतिम विकास योजनेमध्ये दर्शविलेल्या वापर विभागानुसार योजेने अतंर्गत जमिनीच्या अकृषक वापरा करिता मानिव रूपांतर बाबतची तरतूद करण्यात आली आहे. व पोटकलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे रूपांतर कर, अकृषक आकारणी आणि लागू असेल तेथे नजराना किंवा अधिमुल्य, किंवा इतर शासकीय देणी यांचा भरणा केला असेल तर अश्या या क्षेत्रात समाविष्ट असलेल्या कोणत्याही जमिनीचा वापर हा, अश्या विकास योजेणेतील वाटप, आरक्षण किंवा निर्देशीत या कारणपात दर्शविलेल्या वापरात रूपांतरीत करण्यात आले असल्याने मानण्यात येईल आणि अश्या विकास योजनेनुसार अनुज्ञेय असलेल्या वापराकरिता कलम ४२ किंवा कलम ४४ अन्वये इतर कोणत्याही स्वतंत्र परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही.

अर्जदार यांच्यातर्फे खालील अटींच्या आधारे निवासी अकृषक सारा शासन जमा करण्यात येईल.

१. अर्जदार यांनी नियोजन प्राधिकरण यांचेकडुन अभिन्यास मंजूरी करून घेणे बधनकारक राहील.
२. बांधकाम करण्यापुर्वी संबधित नियोजन प्राधिकरण यांचेकडून परवानगी घ्यावी लागेल.
३. प्रस्तावित ठिकाणी किमान १२.०० मी. रूद पोच रस्ता आवश्यक राहील.
४. नकाशा मंजुरीपश्चात तहसिल कार्यालयाकडून सनद प्राप्त करून घेणे बधनकारक राहील.
५. अर्जदार यांनी मौक्यावर बांधकाम सुरू करण्यापुर्वी तहसील कार्यालय येथे लेखी कळवावे व

त्यानंतरच बांधकाम सुरू करावे. तसेच मंजूर अभिन्यासची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

संदर्भिय पत्र क्रं. ३ अन्वये मा.सहाय्यक संचालक, नगर रचना नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नागपूर यांचे पत्र जा.क्रं.मं.वि.यो./ना.म.क्षे./उसंन (नामप्रविप्रा)/१२२३६, दिनाक ११/७/२०२० अहवालानुसार मंजुर विकास योजनेनुसार उक्त South C Seetor मध्ये असून उक्त जागा निवासी (R4) & 18.00 C Seetor Mt.Widr Road या विभागात समाविष्ट आहे.

उपरोक्त प्रमाणे जागेचे एकुण क्षेत्रफळ ८५०० चौ.मी. अकृषक सारा आकरणी करावयाचे क्षेत्र म्हणजेच ८५०० चौ.मी. यास ०.०५ पैसे प्रती चौ.मी. याप्रमाणे अकृषक महसूल कर रूपये ४२५/- ग्रामपंचायत सेस कर अकृषक कराएवढा रूपये ४२५/- जिल्हा परिषद सेस सारा ७ पट अकृषक कराच्या रूपये २९७५/- परावर्तीत अकृषक साऱ्याच्या ५ पट म्हणजेच रूपये २१२५/- असे एकुण रूपये ५९५०/- शासन खजिना जमा करण्यात यावे अर्जदार यांना अटी व शर्तीच्या आधारे निवासी अकृषक आकरणी शासन जमा करण्याचा आदेश देण्यात येत आहे.

(संतोष खांडरे)
तहसिलदार, हिंगणा

प्रतिलोपी :-

१. मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.उपविभागीय अधिकारी, नागपूर (ग्रामीण) यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.उपसंचालक, नगर रचना, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर माहितीस आवश्यक कार्यवाहीस.
४. तलाठी, सा.क्रं. ६ मौजा नागलवाडी यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
५. दुय्यम निबंधक, तहसिल कार्यालय, हिंगणा यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
६. अर्जदार शिवाजी गृप तर्फे प्रविन विनायक राउत, राह.नागपूर, तह.जि.नागपूर यांना माहितीस तथा उपरोक्त अटी व शर्तीच्या पुर्तता व अंमलबजावणी करण्यासाठी तसेच अकृषक कराची रक्कम रूपये ५९५०/- चालनच्या स्वरूपात शासन जमा करण्याकरीता रवाना.

(संतोष खांडरे)
तहसिलदार, हिंगणा

तहसिलदार हिंगणा